-प्रियदर्शन मनोहर (पिट्स्बर्ग, पेन्सिल्वेनिया )

## अठरावे बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, ग्रँड रॅपिड्स, मिशिगन

जुलै ७ ते ९ च्या अडीच दिवसात डेट्रॉईट, मिशिगन पासून दोन तासांच्या अंतरावर असलेल्या ग्रँड रॅपिड्स ह्या छोट्याशा, टुमदार गावात बृहन महाराष्ट्र मंडळाचे अठरावे अधिवेशन सौ. अंजली अंतुरकर ह्यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाले. ह्यासंमेलनाला ३,५०० मराठी माणसं जमली होती आणि तरीही व्यवस्था अगदी चोख होती! सकाळी साडेसहापासून नाश्त्याला सुरुवात व्हायची ते रात्री अकरा पर्यंत कार्यक्रम चालू असायचे! डेट्रोईटच्या स्वयंसेवकांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे! कुठेही आसन, भोजन, वाहन (ट्रान्सपोर्ट), शयन (हॉटेल्स), नाव नोंदणी (रजिस्ट्रेशन), कार्यक्रम (प्रोग्रामिंग), रंगमंच व्यवस्था, ध्वनी आणि प्रकाश योजना, माहिती व्यवस्था कोलमडली नाही. बहुतेक सगळे कार्यक्रम वेळेवर सुरु झाले आणि वेळेवरसंपले. बहुतेक सगळ्या कार्यक्रमांचा दर्जा उत्तम होता. खरोखरच दृष्ट लागावे, अत्यंत संस्मरणीय ठरावे असे हे एक संमेलन होते. बऱ्याच वेळा समांतर सत्रांत कार्यक्रम होते त्यामुळे मला सर्व कार्यक्रम पाहता आले नाहीत. मी जे कार्यक्रम पाहिलेत्यावरील माझी मतं खालीलप्रमाणे:

शुक्रवार, जुलै ७, २०१७

१. उदघाटन समारंभ - संमेलनाचे उदघाटक, गोव्याचे सध्याचे मुख्यमंत्री आणि भारताचे भूतपूर्व संरक्षण मंत्री श्री. मनोहर पर्रीकर ह्यांचे छोटेसे पण छान भाषण झाले. ह्या उदघाटन सोहळ्यात संमेलनाची साहित्यिक पताका म्हणून 'अस्मिता' नावाची एक अतिशय सुंदर स्मरणिका प्रसिद्ध करण्यात आली. त्यात अनेक अमेरिकन मराठी लेखकांचे लेख, कविता, कथा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. उदघाटनाच्या औपचारिक कार्यक्रमानंतर डिट्रॉइट मराठी मंडळातर्फे "रंग मराठी मनाचे" हा दोन-
अडीच तासांचा उत्कृष्ट कार्यक्रम सादर करण्यात आला. ह्या कार्यक्रमात वेगवेगळ्या रंगात चपखल बसणारी गाणी घेऊन त्यावर नृत्ये सादर करण्यात आली - उदाहरणार्थ, हिरवा म्हणजे निसर्ग, पांढरा म्हणजे पवित्र, लाल रंग प्रेमाचा, भगवाभक्तीचा वगैरे. सूत्रसंचलनही चांगलं, सुसंबद्ध होतं. हा कार्यक्रम mind
blowing झाला त्याला कारण म्हणजे २७५ कलाकारांचा सहभाग आणि त्यातही चार वर्षांपासून सत्तर वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत सर्वांचा सहभाग होता! हे खरोखरच अभूतपूर्व होतं! तिन्ही पिढ्या एकत्र एका ठिकाणी काम करताना बघून आनंदाने डोळे पाणावले.

२. डॉक्युमेंटरी फिल्म्स: एकूण पाच माहितीपट दाखवण्यात आले. त्यातले दोन खालीलप्रमाणे:

'रांगोळी' वर फिनिक्सच्या सौ. माधुरी बापट ह्यांनी निर्माण केलेला माहितीपट मस्त होता. शेकडो, हजारो वर्षांची परंपरा लाभलेला रांगोळी हा एक कलाप्रकार आहे. त्यात संस्कृतीचं, पौराणिक कथांचं, धर्माचं प्रतिबिंब पडतं पण त्याच बरोबर त्यातगणिती सूत्रं पण गोवलेली आहेत ही माहिती नव्यानेच मिळाली. इतकंच नाही तर सौ. बापट ह्यांनी शाळेत रांगोळी काढायला शिकवल्यास मुलांना गणित शिकण्यास मदत होते हे सिद्ध केलेलं आहे. त्यांनी आता रांगोळीतून गणित शिक्षणाचाअभ्यासक्रम तयार केला असून हा अभ्यासक्रम भविष्यात कदाचित अमेरिकेतल्या सर्व शाळांना उपलब्ध होऊ शकेल.

'संगीत गोविंदगौरव'
- सुप्रसिद्ध पेटीवादक गोविंदराव पटवर्धन ह्यांच्या जीवनावर आधारित सुंदर माहितीपट श्री. धनंजय मेहेंदळे ह्यांनी निर्माण केलेला आहे. त्यातला २२ मिनिटांचा भाग दाखवण्यात आला. पूर्ण DVD एक तासांची आहे.

३. सिॲटलचा 'नमन नटवरा' हा नाट्य संगीताचा कार्यक्रम अतिशय सुंदर झाला. इथे नाट्यसंगीताच्या टप्प्यांचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी 'संगीत शारदा' मधला एक प्रवेशही करून दाखवण्यात आला.

४. रात्री वॉशिंग्टन डी सी च्या कलाकारांनी 'ब्लॅक गेम' ही रहस्यमय, थ्रिलर एकांकिका सफाईने सादर केली. सगळ्यांचा अभिनय उत्तम झाला. ही एकांकिका मी आधी दोन वेळा पाहिली असूनही तिसऱ्यांदा पाहताना तितकीच उत्कंठापूर्ण वाटली हे अभिनेत्यांचे यश होय!

शनिवार, जुलै ८, २०१७:

सकाळच्या सत्रापूर्वी ग्रंथदिंडी ढोल ताशांच्या गजरात निघाली. शालू-शेले-नऊवारी साड्या-
नथी घातलेल्या मराठी स्त्रिया आणि पारंपरिक पोशाख आणि फेटे-
पगड्या घातलेले पुरुष आपापल्या गावोगावच्या मराठी मंडळांचे झेंडे नाचवत ग्रँड रॅपिड्सचाट्राफिक थांबवून मैलभर चालत, नाचत निघाले. अशी दिंडी ह्या संमेलनात प्रथमच काढण्यात आली.

१. सकाळच्या सत्रात 'संगीत संशय कल्लोळ' चा धमाल प्रयोग पहिला. मूळ पाच अंकी आणि रात्रभर चालणारं नाटक आता दोन तासात आणि दोन अंकात बसवलेलं आहे पण नवं नाटक झकास आहे! राहुल देशपांडे ह्यांचा **अश्विनशेठ** आणि उमा पळसुले देसाई ह्यांची नक्षत्रासारखी लखलखणारी रेवती ह्यांच्यावर संगीताची धुरा आहे. त्यांच्या पदांनी खूपच बहार आली.

संशय कल्लोळ नाटकाच्या दोन्ही प्रयोगांच्या मध्यंतरात एकूण अठरा अमेरिकन मराठी लेखकांच्या पुस्तकांचं जाहीर प्रकाशन करण्यात आलं. ह्यातील दोन पुस्तकं ('ठसे आठवांचे' - डॉ. विनता कुलकर्णी आणि 'माझी उद्योगी मुशाफिरी'
- मोहनरानडे) मी विकत घेतली.

२. दुपारच्या सत्रात बे एरियाचा 'शक्तीरूपेण' हा स्त्री शक्तीची विविध रूपे दाखवणारा कार्यक्रम सुकन्या कुलकर्णी ह्यांनी सादर केला. ह्यातली नृत्ये, वेशभूषा आणि प्रकाश योजना नेत्रदीपक होती. सुकन्या कुलकर्णी ह्यांचे सूत्रसंचलन उत्तमहोते.

३. संध्याकाळच्या सत्रात 'एकापेक्षा एक' हा मुलांचा विविध गुणदर्शन उर्फ टॅलेन्ट शो झाला. तरुण मुलांना इथे ह्या संमेलनात स्टेज देण्यात आलं ही खरंच चांगली गोष्ट आहे.

४. रात्रीच्या सत्रात बेला शेंडे आणि स्वप्नील बांदोडकरांचा गाण्याचा कार्यक्रम होता. दुर्दैवाने ह्या कार्यक्रमाने बरीच निराशा केली. त्याचं मुख्य कारण मला असं वाटतं की ह्या गायकांची गाण्यांची निवड चुकली. अमेरिकेतील मराठी माणूस भारतीयTV वरच्या मराठी मालिका बघत नाही. त्यामुळे त्या मालिकांची शीर्षक गीते प्रेक्षकांच्या परिचयाची किंवा आवडीची नव्हती. कार्य क्रमाच्या मध्यंतरात बृहन महाराष्ट्र मंडळाने विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचा सन्मान केला - उदाहरणार्थ कला, साहित्य आणि संस्कृती, विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षण, उद्योजन, सेवा कार्य, मराठी शाळा इत्यादी. सांगण्यास आनंद होतो की अमे रिकेत आज ६६ मराठी शाळा निर्माण झाल्या असून त्यात भारती विद्यापिठाने नेमून दिलेला मराठीचाअभ्यासक्रम शिकणारी १,७२० मुलं आहेत!

रविवार, जुलै ९, २०१७:

१. सकाळच्या आणि ह्या दिवशीच्या एकमेव सत्रात श्री. महेश काळे ह्यांचा 'सूर निरागस हो' हा गाण्याचा अत्युत्कृष्ट कार्यक्रम पाहण्याचं आणि ऐकण्याचं भाग्य श्रोत्यांना मिळालं! महेश हा केवळ उत्कृष्ट गायक आहे असं नाही तर तो अप्रतिम

प्रेझेंटर आहे आणि त्याहूनही महत्वाचं म्हणजे त्याचा उत्साह, प्रेमळपणा, आणि प्रेक्षकांना कार्यक्रमात सामावून घेण्याची हातोटी अद्वितीय आहे.

पुढील संमेलनासाठी सुधारणा सुचवायच्या झाल्या तर तीन गोष्टी मी सुचवीन: १. शक्यतो सर्व कार्यक्रम जवळ जवळ व्हावेत म्हणजे ह्या सत्रातून त्या सत्रात जाताना फारसे कष्ट पडणार नाहीत किंवा वेळ फुकट जाणार नाही. २. मोठया उंच एरिना मध्ये कार्यक्रम असेल तर ज्येष्ठ नागरिकांची बसण्याची सोय खालच्या मजल्यावरच करावी म्हणजे त्यांना अनेक पायऱ्या चढा-
उतरायला लागणार नाहीत. ३. भारतातून गाण्याचे कार्यक्रम आणले तर कलाकारांना अमेरिकन मराठीमाणसांच्या अभिरुचीची /अपेक्षांची नीट कल्पना द्यावी म्हणजे त्यांना गाण्यांची योग्य निवड करता येईल.

एकूण संमेलन खरोखरच अद्वितीय झाले आणि आता तृप्त मनाने मी घरी पोचलो आहे. डेट्रॉईट महाराष्ट्र मंडळाचे मनापासून आभार! आता वेध डॅलस, टेक्ससचे - अजून दोन वर्षांनी, पुन्हा जरूर भेटूया!

....................................................................................

**विजया मराठे, पमोना कॅलिफोर्निया**
maratheviju@gmail.com.

असामान्य बृहन्महाराष्ट्र अधिवेशन २०१७

शुक्रवार दिनांक सात जुलै रोजी BMM २०१७ अधिवेशनाच्या कार्यक्रमाची सुरवात Grand Rapids Michigan येथील Van Andel सभागृहात झाली. हे सभागृह भव्य असून रंगमंचहि राजेशाही होता. रंगमंचाच्यामागे व त्याच्या दोन्ही बाजूला प्रचंड स्क्रीन्स होत्या. आम्ही चारहजार मराठी माणसं सभागृहात जमलो होतो. काही भव्य, सुरेख मराठी कार्यक्रमाची लवकरच सुरवात होईल या विचारात असतानाच वाद्यवृंदांसह अमेरिकन राष्ट्रगीताची सुरवात झाली अन डोळ्यातून अश्रू पाझरू लागले. त्यानंतर भारतीय राष्ट्रगीत झाले अन आम्ही नकळत ते गाऊ लागलो. जाणीव झाली कि जशी मी भारतीय आहे तशीच गेल्या चाळीस वर्षांच्या सहवासात मी एक अमेरिकनही आहे. आपल्या जन्मभूमीइतकेच आपल्या कर्मभूमीचे ऋणी असणे हे मराठी माणसाचे वैशिष्ट्यच नव्हे का? भारतात असताना एक बीज पेरले गेले त्याची पाळेमुळे खोलवर रुजली होती,ती भक्कम होती म्हणूनच त्या मोठ्या झालेल्या वृक्षाचा भर सोसू शकली. पण त्या छोट्या रोपट्याचा वृक्ष होण्यासाठी त्याला खतपाणी घालण्याचं काम अमेरिकेने केले. आणि याची जाणीव मराठी माणसाला नक्कीच आहे. हि राष्ट्रगीते अनेक वाद्यांवर वाजवणारी मुले बहुतांशी भारतीय होती याचा अभिमान वाटला.
त्यानंतर " रंग मराठी मनाचे" या कार्यक्रमाला सुरवात झाली. रंग मराठी मनाचे हि कल्पनाच किती रम्य आहे! खरच या रंगांशी,आपल्या आठवणी,भावना जुळलेल्या असल्यामुळे त्यांच्याशी आपले जवळचे नाते आहे. रंगमंचावर एक स्त्री व एक पुरुष वेगवेगळ्या रंगांचे कपडे परिधान करून रंगांचे महत्व सांगत होते,व त्या रंगांशी निगडित असलेल्या आठवणींचे, भावनांचे चित्र नृत्यातून दर्शवले जात होते. केशरी रंगाचा झेंडा शिवाजी महाराज,झाशीची राणी लक्ष्मीबाई यांना घेऊन आला तर पांढऱ्या रंगाने सरस्वती पूजन केले व पांढऱ्या वेशातील वारकऱ्यांनी हरी नामाचा गजर केला. हिरव्या गार शेतांच्या रंगांनी शेतकऱ्यांनी आनंदोत्सव केला तर गुलाबी रंगानी प्रेमाच्या छटा दाखवल्या.पांढऱ्या रंगापासून काळ्या रंगापर्यंत सजलेल्या या कार्यक्रमाने प्रेक्षकांची मने जिंकली.प्रेक्षकांच्या डोळ्यातून आनंदाश्रू झरले. हे अश्रू त्या रंगांशी निगडित असलेल्या आठवणीचे, भावनांचे होते. या कार्यक्रमात लहानांपासून थोरांपर्यंत सगळ्यांचा समावेश होता. या कार्यक्रमात एक दोन हिंदी व मराठीगाण्यांवर आधारित नाचही होते. इतर भाषिकांना सामावून घेण्याची प्रवृत्ती मराठी भाषिकांकडे निश्चितच आहे.
त्यानंतर झालेल्या सर्व कार्यक्रमांची निवड उत्तम होती.स्थानिक व भारतीय कार्यक्रम एकाच वेळी असूनही सर्व कार्यक्रमांना उपस्थित भरपूर होते.स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम भारतातील कलाकारांच्या कार्यक्रमाइतकेच उत्तम झाले. व सभागृहे शेजारी शेजारी असल्याने थोडा वेळ का होईना पण दोन कार्यक्रमांचा आस्वाद घेता आला..

जेवण व जेवणाची व्यवस्था उत्तम होती.पाच मिनिटांपेक्षा जास्त वेळ मला कधीही जेवणाच्या रांगेत थांबायला लागले नाही.तसेच बसेसची व्यवस्थाही उत्तम होती.सर्व स्वयंसेवकांनी अपरंपार काम केले. ठिकठिकाणी त्यांची उपस्स्थिती जाणवत होती. सर्व कार्यक्रम वेळेवर सुरु होत होते. एकंदरीत अधिवेशन शिस्तबद्ध व आखीव वाटले. दिव्यत्वाची येथे प्रचिती झाली. अधिवेशन मंडळ व सर्व स्वयंसेवक याना त्रिवार वंदन.
मी पाहिलेले सर्व कार्यक्रम उत्तम झाले.मी तीन नाटके पहिली.अग्निदिव्य,मोरूची मावशी व घाशीराम कोतवाल. या तिन्हीही वेगळ्या प्रकारच्या पण उत्तम कलाकृती होत्या. नाट्यसंगीताचा कार्यक्रम नमन नटवरा उत्कृष्ट झाला.थोड्या वेळासाठी नाना पाटेकर व सोनाली कुलकर्णी यांची मुलाखतही ऐकायला मिळाली.पाटेकरांचा विनोद व सोनालीचा विनय व प्रांजळपणा आवडला. त्यांची समाजकार्याची आवड मनाला भावली.दाढे-जोशींचा कार्यक्रम थोड्या वेळासाठी ऐकायला मिळाला अन कॉलेजच्या दिवसात घेऊन गेला.शक्तिरूपेण हा स्त्रीशक्तीवरील कार्यक्रम उत्तम झाला. कविता उत्कृष्ट होत्या व नृत्येही भव्य होती. मी दिंडीत भाग घेतला होता. क्षणिक पंढरपूरच्या वारीला गेल्याचा भास झाला.
बेला शेंडे व स्वप्नील बांदोडकर यांचा कार्यक्रम सुरेख झाला.महेश काळे यांच्या कार्यक्रमाने अधिवेशनाचा कळस गाठला.त्यांचा असामान्य आवाज व संगीताची जाण यामुळे सर्व प्रेक्षक आनंदाने डोलत होते. त्यांच्या सुरात सूर मिसळून नकळत गात होते.शिवाय त्यांनी प्रेक्षकांशी एकप्रकारे नाते जोडले. आजी आजोबा व नातवंडे यांच्या प्रेमाशी संगीताचे नाते जोडले. तसेच आम्ही जीन्स व शर्ट घातले म्हणजे मराठी संस्कृती सोडली नाही वगैरे बोलून त्यांनी प्रेक्षकांना आपलेसे केले.शेवटी भजन व कट्यारीतील गाणी नक्कीच सगळ्यांच्या काळजात घुसली. महेश काळे यांचा कार्यक्रम शब्दांच्या पलीकडचा होता. त्यांची गाणी गुणगुणतच आम्ही सभागृहाचा निरोप घेतला. हे अधिवेशन म्हणजे एक असामान्य अनुभव होता. अधिवेशन मंडळ व सर्व स्वयंसेवक यांचे मन:पूर्वक आभार
*******

**- वसुंधरा पर्वते (पुणे)**

अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र अधिवेशन २०१७
या वर्षीचं बीएमएम आजवर सर्वोत्तम ठरलेल्या अनेक अधिवेशनांमधलं एक असं म्हणावं लागेल.
उत्तर अमेरिका आणि कॅनडा यातील मराठी मंडळीच्या २०१७ च्या या संमेलनाचं ठिकाण मिशिगनमधलं ग्रँड रॅपिडस हे शहर होतं. नदीच्या किनाऱ्याला असलेलं देव्होज प्लेस हे अतिभव्य कन्हेन्शन सेंटर, शहराच्या नावाला शोभेल असंच ग्रँड होतं. आत अडीच हजार माणसं बसतील एवढं विशाल सभागृह, शिवाय लहान मोठे हॉल आणि दहा मिनिटं चालण्याच्या अंतरात असलेलं व्हॅन ॲडेल ॲरिना. ॲरिना म्हणजे पाच सहा हजार माणसं बसतील असं भव्य स्टेडियम, त्याला शोभेल असं स्टेज आणि त्याच्या दोन्ही बाजुला मोठे स्क्रीन्स. स्टेडियममध्ये दूर बसलेल्या मंडळीना स्टेजवरचे क्लोज अप्स पडद्यावर छान दिसत होते. संमेलनाला आलेली सर्व माणसं बसली तरी स्टेडियमचा निदान एक तृतीयांश भाग तरी मोकळा राहत होता.
" मंत्र श्रमाचा, ध्यास गतीचा-गर्व मराठी संस्कृतीचा " हे या वर्षीच्या संमेलनाचं बोधवाक्य होतं.
या वेळचे बहुतेक कार्यक्रम संगीतावर आधारलेले होते असं म्हणायला हरकत नाही. शुक्रवारी सकाळी ठीक नऊ वाजता संमेलनाच्या कार्यक्रमाला सुरूवात झाली. उद्घाटनासाठी आले होते गोव्याचे मुख्य मंत्री मनोहर पर्रीकर. अतिशय साधे, निगर्वी आणि स्वच्छ चारित्र्याचे म्हणून प्रसिद्ध असलेल्या पर्रीकरांनी आपल्या साधेपणाने सर्वांना जिंकलं. राजकारणात असल्याचा कुठलाही अभिनिवेश त्यांच्या भाषणात नव्हता. आपले आय आयटीतले अनुभव मजेत सांगत आपलं सुटसुटीत भाषण त्यांनी वेळेवर संपवलं. त्यानंतर डेट्रॉईटच्या मराठी मंडळीनी " रंग मराठी मनाचे " या कार्यक्रमाने संमेलनाचा शुभारंभ केला. त्याआधी गुरूवारी उत्तररंग, उद्योजक, डॉक्टरस यांचे परिसंवाद असे कार्यक्रम होते पण त्या वेळी फक्त या कार्यक्रमांशी संबंधित एवढीच मंडळी हजर होती. संमेलनाचे बहुसंख्य प्रतिनिधी गुरूवारी रात्रीपर्यंत तिथे पोचले.
' रंग मराठी मनाचे ' या कार्यक्रमात सप्तरंगांशी निगडित असलेले प्रसंग, भावना, निसर्ग यावर आधारित गाणी

आणि नृत्यांचा समावेश होता. अतिशय समर्पक आणि प्रभावी सूत्रसंचालन, प्रत्यक्ष गाणारे गायक, विविध वेषभूषांनी नटलेले नर्तक, त्यांची बहारदार नृत्यं आणि त्या त्या प्रसंगानुसार व्यासपीठामागे असलेल्या भव्य पडद्यावर उमटणारी दृष्यं यामुळे हा कार्यक्रम अक्षरशः रंगतदार झाला. भगवा रंग-शिवाजी महाराजांशी निगडित, हिरवा रंग म्हणजे बालकवीची फुलराणी, पिवळा रंग हळदीचा-नव्या नवरीचा, पांढरा रंग पावित्र्याचा-पंढरीच्या वारीचा, गुलाबी रंग प्रेमाचा, लाल रंग प्रेमाचा तसंच स्वातंत्र्यासाठी सांडलेल्या रक्ताचा अशा प्रकारे शिवाजीमहाराजांपासून सुरूवात करून सावरकरांपर्यंत हा विविध रंगांचा प्रवास, उत्कृष्ट निवेदन, समर्पक गाणी आणि सुरचित नृत्यं यामुळे प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून गेला. या कार्यक्रमात पाच सहा वर्षांच्या मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत दीडशेच्या वर कलाकारांचा समावेश होता.
त्यानंतर दिवसभर कार्यक्रमांची रेलचेल होती. माऊली हे शिकागोचं, ब्लॅक गेम हे वॉशिंग्टनचं आणि अग्निदिव्य हे न्यू जर्सीने सादर केलेलं नाटक अशी नाटकं होती. रामायण हा नृत्य-नाट्याचा कार्यक्रम होता, नमन नटवरा हा सीअ‍ॅटलने सादर केलेला नाट्यसंगीताचा कार्यक्रम केवळ अप्रतिम. केवळ हार्मोनियमवर वाजवलेलं सूरत पियाकी हे गाणं आणि शारदा नाटकातला एक छोटासा प्रवेश-त्यातल्या ' अवघे पाऊणशे वयमान"सह या कार्यक्रमाला कुठल्याकुठे घेऊन गेलं. याशिवाय ऋजुता दिवेकरचं आहारावरचं भाषण, पं. शंकर अभ्यंकरांचं प्रवचन आणि राजीव सत्यालची स्टँड अप कॉमेडी असे अनेक कार्यक्रम ठिकठिकाणी चालू होते. ज्याला जिथे जाण्याची इच्छा आहे तिथे त्यांनी जावं. त्या रात्री राहुल देशपांडे-अश्विनशेठ आणि प्रशान्त दामले-फाल्गुनराव यांच्या भूमिका असलेलं गोविंद बल्लाळ देवलांचं सदाबहार ' संशयकल्लोळ ' हे नाटक झालं. राहुलच्या गाण्यांना अनेक वेळा वन्समोअर मिळाला आणि प्रशान्त दामलेच्या सहजसुंदर अभिनयाने सगळ्यांना जिंकून घेतलं. मूळ नाटकात नसलेली अनेक समर्पक वाक्यं आणि प्रशान्त दामलेच्या बारीक सारिक हालचालीतून निर्माण होणारे विनोद यांनी नाटकाला चांगलीच रंगत आणली. विशेष म्हणजे हेच नाटक पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी झालं तेव्हा पहिल्या वेळी नाटकाला हजर असलेल्यांपैकी निम्मी माणसं दुसऱ्या प्रयोगालाही उपस्थित होती. नेहमीप्रमाणे नाटकाच्या शेवटी सगळ्या प्रेक्षकांनी उभं राहून कलाकारांना मानवंदना दिली.
दुसऱ्या दिवशी सकाळी ग्रंथदिंडी निघाली. ही दिंडी देव्होज प्लेस पासून अ‍ॅरिनापर्यंत म्हणजे जवळजवळ अर्धा मैल चालली. दिंडीत डेट्रॉईट, न्यू जर्सी, शिकागो, बे एरिआ, कोलंबस, इ. अनेक शहरांचे गट ढोल-ताशे-लेझिम पथकासह सामील झाले होते. एरवी जीन्स,-टीशर्टमध्ये दिसणारे स्त्रीपुरूष त्या दिवशी मराठमोळ्या वेशात होते. ढोल, ताशे, लेझिम खेळणारे मराठी शिलेदाराच्या वेशात तर बायका शालू-पैठण्या-नथी यांनी सजल्या होत्या. अशी ही शानदार दिंडी ग्रँड रॅपिडच्या रस्त्यावरून अतिशय दिमाखाने आणि शिस्तीने चालली होती. अधून मधून पुरूष-बायका नाचतही होत्या, फेर धरीत होत्या, फुगड्याही घालत होत्या. रस्त्यावरून चालणारे अमेरिकन लोक कुतुहलाने बघायला उभे राहत होते. काहीनी तर मिरवणुकीत सामील होऊन फुगड्याही घातल्या. सुमारे पाऊण तासात ही दिंडी अ‍ॅरिनाला जाऊन पोचली. त्यातल्या बहुतेक मंडळीना पुन्हा देव्होस प्लेसला येऊन नऊ वाजता संशयकल्लोळ बघायचं होतं. त्याच वेळात एकीकडे 'रहे ना रहे हम ' या नावाचा मृदुला दाढे-जोशी यांनी सादर केलेला हिंदी गाण्यावरचा अभ्यासपूर्ण कार्यक्रम होता, दुसरीकडे डेट्रॉईटच्या लोकांचं ' मोरूची मावशी' हे नाटक आणि तिसरीकडे फिलाडेल्फियाचं ' तमाशातील तमाशा 'हे नाटक होत्
दुपारच्या जेवणानंतर लगेच ' आम्हाला पण जमतंय ' हे आयोवाचं नाटक, बे एरिआचा ' शक्तीरूपेण' हा स्त्रीशक्तीवर आधारलेला नृत्यनाट्याचा कार्यक्रम आणि सूरसरगम हा अमेरिकेतील युवक कलाकारांचा गाण्याचा कार्यक्रम असे एकाच वेळी असल्यामुळे कुठला बघावा असा प्रश्न पडत होता.
हे कार्यक्रम संपतात न संपतात तोच एकीकडे नॉर्थ कॅरोलिनाचं घाशीराम कोतवाल हे संपूर्ण नाटक, दुसरीकडे रामदास फुटाणे आणि अशोक नायगावकर यांचा हास्यधारा हा कार्यक्रम, तिसरीकडे ' एकापेक्षा एक ' हा लहान मुलांचा टॅलन्ट शो आणि चौथीकडे काव्यवाचन असे विविध कार्यक्रम. त्याच रात्री बेला शेंडे आणि स्वप्नील बांदोडकर यांच्या

गाण्यांची मैफल-रात्री अकरा वाजेपर्यंत चालली. त्याचं सूत्रसंचालन केलं होतं पुष्कर श्रोत्रीने.
रविवारी सकाळी झालेला महेश काळेचा गायनाचा कार्यक्रम सबंध अधिवेशनाला वेगळ्याच उंचीवर घेऊन गेला. कट्यार काळजात घुसली या नाटकाने आणि चित्रपटामुळे लोकांच्या अपेक्षा आधीच उंचावल्या होत्या. त्याहीपेक्षा जास्त उंचीवर हा कार्यक्रम नेऊन महेशने प्रेक्षकांना अक्षरशः वेडं केलं. दोन गाण्यांच्या मध्ये तो प्रेक्षकांशी सहजपणे संवाद साधत होता. गुरूपौर्णिमेच्या दिवशी होत असलेली ही त्याची मैफल त्याने आपल्या गुरूला म्हणजे पं जितेंद्र अभिषेकींना अर्पण केली, त्याची गाणी तर अप्रतिम झालीच शिवाय त्यांनी मोरयाचा अणि विठ्ठलाचा गजर श्रोत्यांकडून करून घेत त्यांनाही मैफलीत सामील करून घेतलं. त्यानंतर त्याने एक गंमत केली, फेसबुक उघडलं आणि त्याचं गाणं, त्यातला प्रेक्षकांचा सहभाग सबंध जगात पोचेल अशा पद्धतीने सादर केलं. त्या गाण्याला सगळीकडून येणारे प्रतिसाद आम्ही प्रत्यक्ष पडद्यावर, फेसबुकच्या पानावर पाहात होतो. मग त्याने आणखी एक गोष्ट केली. तो म्हणाला,
" तुमच्याकडे फोन आहेत का? "
प्रेक्षकांतून मोठ्ठा होकार आला.
" मग त्या फोनचे लाईटस लावा आणि तो हलवत राहा "
मग एक नवल घडलं. स्टेडिअमच्या अंधारात दिव्यांचे शेकडो काजवे चमकायला लागले आणि या काजव्यांच्या साक्षीने तो ' कट्यार ' मधलं मनमंदिरा हे प्रसिद्ध गाणं तो गायला लागला, प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. खरोखरीच ते दृष्य अपूर्व होतं. आधुनिक तंत्रज्ञानामुळे होणारा हा चमत्कार आम्ही आमच्या डोळ्यांनी अनुभवला. लोक तृप्त झाले. या तीन दिवसात पहिल्यांदाच कार्यक्रम दुपारी बाराऐवजी एकला संपला कारण प्रेक्षकांना तो संपूच नये असं वाटत होतं.
त्यानंतर डॅट्रॉईटच्या सुमारे तीनशे जणांच्या संयोजक टीमचं कौतुक, नव्या कार्यकारिणीची ओळख वगैरे औपचारिक समारंभही थोडक्यात पार पडले आणि मंडळी परतीच्या प्रवासाला निघाली.
संमेलनाला येणाऱ्यांच्या मुलांसाठी -ज्यांना मराठी कार्यक्रम बघण्यात फारसा रस नसतो त्यांच्यासाठी ड्रॉईंग. पेंटींग, कुकींग असे अनेक उपक्रम होते. लहान मुलांसाठी डे केअरची व्यवस्था होतीच.
या संमेलनाचं वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक कार्यक्रम नियोजित वेळेवर सुरू झाला आणि दिलेल्या वेळात संपला. वेळेचं गणित कटाक्षाने पाळण्यात अर्थातच सर्वात मोठा वाटा संयोजकांचा होता. त्यांना कलाकार आणि प्रेक्षक यांचं सहकार्य मिळालं.
भारतातून आलेल्या कलाकारांनी तर संमेलन गाजवलंच पण त्याचबरोबर इथल्या स्थानिक कलाकारांची संख्याही खूप होती. विशेष म्हणजे अमेरिका आणि कॅनडा इथल्या वेगवेगळ्या शहरातून आलेले नाट्य तसंच संगीताच्या कार्यक्रमांचा दर्जा फारच चांगला होता. आपापले व्यवसाय सांभाळून या हौशी मंडळींनी परदेशात राहून आपले कलागुण जोपासले आहेत हे विशेष. अशा दर्जेदार स्थानिक कार्यक्रमांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे ही खरोखरच अभिमानास्पद गोष्ट आहे.
अशा प्रकारच्या संमेलनात चांगल्या कार्यक्रमांबरोबर चांगल्या आदरातिथ्याची म्हणजे विशेषतः चांगल्या जेवणाची अपेक्षा असते. खरं सांगायचं तर संमेलनाचं यश मुख्यतः जेवणाच्या उत्तम व्यवस्थेवर अवलंबून असतं असं म्हटलं तरी चालेल. इतर कार्यक्रम कितीही चांगले असले आणि जेवणाची नीट सोय नसेल तर ' संमेलन काही फारसं चांगलं झालं नाही ' असं लोक म्हणतात हा अनुभव आहे. त्याही बाबतीत डेट्रॉइटकर चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाले. जवळजवळ साडेतीन हजार माणसांच्या नाश्त्याची, चहापाण्याची आणि दोन वेळा जेवणाची तीन दिवस सर्वांना पसंत पडेल अशी सोय करणं हे काम खूप म्हणजे खूपच कठीण आहे. जेवणाचा मेन्यू आवडला पाहिजे, काहीही कमी पडता कामा नये, लोक जसजसे येतील तसतसं त्यांना ते पुरवता यायला हवं, कुणालाही रांगेत फार वेळ उभं राहायला लागू नये ही सगळी तंत्रं संभाळणं ही तारेवरची कसरत आहे. ही कसरत पार पाडण्यात संयोजक यशस्वी झाले असं

सगळ्यांचंच मत होतं. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी आवर्जून वेगळे काऊंटर्स ठेवले होते. लहान मुलं असलेल्या कुटुंबांसाठी वेगळे काऊंटर्स होते. पदार्थ संपत आला की लगेच ट्रे भरला जात होता, बसण्याची टेबल्स भरपूर होती. एकदा तर अडीच हजार माणसं एकाच वेळी नाटक बघून जेवणघरात आली तरीही सगळ्यांना फारसं रांगेत उभं राहायला न लागता जेवण मिळालं. मेन्यूतले पदार्थही भरपूर होते. कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, पुणेरी अशा पद्धतीच्या विविध मेन्यूत चार भाज्या, पुऱ्या, पोळ्या, भाकरी, पुरणपोळी, वरण-भात, दर वेळी दोन गोड पदार्थ आणि दोन नॉन व्हेज पदार्थ- शिवाय जेवणानंतर आईस्क्रीम.
त्यातले बरेच चांगले होते, काही खूप वेगळेही होते. विशेषतः अननस-फणसाची भाजी. काजुची उसळ, शेवग्याच्या शेंगाचं पिठलं, थालिपीठ, काकडीचा केक, लाल भोपळ्याची भाजी असे पार्टीत सहसा न ठेवले जाणारे पदार्थ होते. ते लोकांना आवडले. बाकी ब्रेकफास्टला साबुदाण्याची खिचडी, उपमा, पोहे, पुरी-भाजी, गोडाचा शिरा, सीरिअल, योगर्ट इ होतंच. कुठलाही पदार्थ कमी पडला असं झालं नाही. याशिवाय चहा-कॉफीचं सत्र चालूच होतं. शेवटच्या दिवशी ॲरिनामधला कार्यक्रम संपवून मंडळी जेव्हा परतीच्या प्रवासाला निघाली तेव्हा दाराबाहेर त्यांच्यासाठी फूड पॅकेटस तयार होती.
व्हॅन ॲडेल ॲरिना आणि मुख्य कार्यक्रमाचं-जेवणाचं ठिकाण यातलं अंतर चालायला अर्धा मैल होतं पण ह्या अंतरासाठी बसेसची छान सोय होती. त्यामुळे या दोन ठिकाणी असलेल्या कार्यक्रमांना जाणं सोपं झालं होतं.
तिथे दिवसभर हिडता हिंडता अनेक माणसं भेटत गेली. जेवणाच्या टेबलावर, चहा पिता पिता, कॉरिडॉरमध्ये बऱ्याच वर्षात न भेटलेली, नव्याने ओळख झालेली, नवी ओळख निघालेली अशा माणसांबरोबर गप्पा होत होत्या. प्रत्येकाच्या गळ्यात त्याच्या नावाचं कार्ड लटकत होतं त्यामुळे अनेकदा नाव बघूनही ओळख निघत असे. मायदेशापासून हजारो मैलांवर कित्येक वर्षं राहणाऱ्यांच्या मनात आपल्या मराठी माणसांबद्दल किती ओढ आहे हे जाणवत होतं.
दर दोन वर्षांनी होणाऱ्या या संमेलनाचं आयोजन करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने इथली मराठी मंडळं पुढे येतात. स्वतःच्या नेहमीच्या जबाबदाऱ्या संभाळत संमेलनासाठी दोन दोन वर्षं अक्षरशः राबतात, दिवसरात्र एक करून संमेलन यशस्वी करण्याचा प्रयत्न करतात, नाटकं करतात, त्यासाठी लागणारे पोषाख, सेट बनवायला त्यांच्या शिवाय कोणी नसतं, खुर्च्या उचलण्यापासून पाहुण्यांना आणणं-पोचवणं-त्यांची सर्व प्रकारची व्यवस्था करणं अशा अनेकविध कामांसाठी मोलाने मिळणारी माणसं इथे नाहीत, प्रत्येक ठिकाणी स्वतःच राबावं लागतं. कुठल्याही प्रकारचा इव्हेण्ट मॅनेजमेंटचा अनुभव पदरी नसताना एवढ्या मोठ्या सोहळ्याचं आयोजन अतिशय बारीक सारिक गोष्टींचा विचार करून करण्यासाठी जबरदस्त इच्छाशक्ती तर हवीच शिवाय व्यवस्थापन कौशल्यही हवं. डेट्रॉईटच्या जवळजवळ ३०० मराठी स्वयंसेवकांच्या टीमने हे शिवधनुष्य समर्थपणे पेललं यात शंका नाही.
अमेरिकेत राहणाऱ्या तसंच काही दिवस मुक्कामाला येणाऱ्या सर्व लहानथोर मराठी मंडळींनी किमान एकदा तरी अशा संमेलनाचा अनुभव जरूर घ्यावा असं मला वाटतं. यानंतरचं २०१९ चं अधिवेशन टेक्सास प्रांतातल्या डलासमध्ये आहे. डलासच्या मंडळाने त्या दिशेने तयारीही सुरू केली आहे आणि सर्वांना तसं आमंत्रणही दिलं आहे.

**Girish Godbole (Pittsburgh, PA)**

First, I must say that the event was wonderful and thoroughly enjoyable. The programs were of high quality, food was good and overall organization / time management was also very good. My thanks and congratulations to all the BMM team.
I also wanted to point out 3 important suggestions for future conventions …I hope that BMM takes these into account while planning the future conventions.

1. Location - having convention in a small city like Grand Rapids was a problem at many levels. First the venues were not all at one place and it was a major inconvenience to everyone (and especially for the older people and some handicapped people). Second, there were not enough hotel rooms in the immediate connected vicinity of the convention center. Third, getting to Grand Rapids from most places in the country was difficult …required expensive flights and connections.
2. Seat Assignment - I know from my personal experience and from several other people who mentioned that the seating did not seem to have been done on first-come-first-served basis. I had registered very early and still had very poorly located seats in one of the far right side sections of the arena from where portions of the stage were not even visible. It will behoove BMM to pay more attention to seating allocations and make sure that it is done in a fair way (announce the criteria for seat assignment and seating charts by sections before registration begins …this will also encourage people to register early and/or become donors, if they don't like the sections they are likely to get assigned to)
3. Safety and Security - I was surprised to see complete absence of any security at the convention center and around the convention center (I say this because of number of reasons …e.g. - walking across the bridge to the Holiday Inn across the bridge was quite unsafe as the bridge and surrounding area was frequented by several homeless people) I feel that there should be at least some basic level of security at BMM conventions given the current atmosphere in the country and given that we have thousands of people attending with ladies wearing expensive jewelry etc. I think BMM should have requested the local police department to provide a couple of police officers at and around the convention center area - especially at night when the programs ended at 11 pm. In many cities, such police presence is provided free of cost to such large events…and even if it were to cost BMM some fees, I would recommend making that investment in the interest of safety and security of our community.

....

**Dr. Prabhakar G. Joshi, Illinois.**
BMM 2017 Post Convention Thoughts:

<u>About The Souvenir Issue:</u>

--1 The Souvenir issue, Asmita, is beautifully printed. However, our name as one of the donors is not there in the donors' list. Ref. p. 121.
Does this mean that we will not give again? The answer is, we follow the principle of Karmanye Va Dhika Raste, Ma Phaleshu Kadaa Chana. For example, we sent several suggestions to president Hon. D. Trump and left at that. After a few weeks, we received a card stating that we are including in the President's advisory committee. We didn't ask for or wait for this recognition.
Also, we sent three-page typed suggestions needed in the 1100-page RamCharitManas, and we left at that. But then we received a call from the editor in Uttar Pradesh that they have included our suggestions in the next edition and they sent us a copy of the new edition free of charge. We did not ask for it, although we were happy with the results.

--2. In the page of Contents of the booklet Antarang, Page number 116 is titled as BMM Puraskar Shishyavritti 2017. Shishyavritti was, I think, another program in the morning of Saturday, the 8th, in which awards were given to students. The Awards ceremony for achievement in different areas was done at night 10:00 p.m. Thus, the title for page 116 should have been something like: "BMM Awardees for Excellence".

--3. Page 109 about Pustak Prakaashan Soholaa: the criteria for the Prakaashan could be included to encourage more authors.

--4. If the cost for printing of the booklet Asmita is to be reduced, only outside covers may be glossy and inside paper may be non-glossy.

About the BMM Convention 2017:

--5. Page 119. President shri Neetin Joshi and the committee members seem to have charisma so that BMM got so many donors. Just look at one group of “15,000 and over”. There are 28 donors in that one category. That meant $420000. Money is a basic force that runs the engine.

--6. The convention was well planned, well organized and the programs were beautifully conducted.

--7. The volunteers were very helpful, understanding and considerate. I noticed that one lady was arguing with one middle aged volunteer and blaming BMM. I was going through the same inconvenience that she was going through. The volunteer was quiet, peaceful and used only comforting language. Personally, I had no complaints; I know during such a huge task, some discomforts may occur.

--8. The bus arrangement and the volunteers’ guidance were superb. Credit is also due to the attendees. There was no crowding at the bus doors. They stood in line like we saw in Japan, where passengers entering trains stand in line and do not crowd at the doors.

--9. The food arrangement was superb where the separate arrangement for seniors was quite appropriate and well followed.

--10. Whenever we called members of the committees, and we called many times before the convention, the members who responded were very cooperative, comforting and helpful.

--11. The attendees seem to have thoroughly enjoyed the classical singing during the ‘Sanshaya Kallol drama and during shri Kale’s ‘Moraya’, Moraya program.

--12. The Awards ceremony of Saturday night was beautifully arranged. A group picture on the stage of the awardees would have been an added attraction.

--13. During the breakfast, lunches, dinners, while walking on the Skyway, in the hotel lobby, in the elevator, in the convention halls, numerous times, many attendees congratulated this writer for getting an award. Many thanked for the contributions to the scholarship and application of the principles of community work. This shows magnanimity on their part.

--14. Just in short period of three days of the convention, it expressed superbly the spirit of Maharashtrians. That was cooperation, coordination, inspiration, togetherness, and enthusiasm.

--15. For our seminar on Meditation and Wills, the wrong title was printed as “Senior Planning”. We never gave this title and these seminars were for all ages and not only for seniors. The titles mentioned in the Abstracts for these seminars were: “Daily Meditation, misconceptions and benefits” and “Importance of having a Will”. Also, the time printed in the program was 10:30 but on the poster outside our seminar hall ‘D’ was 11:00. As a result of these mistakes, the attendance was poor due to confusions on the part of the attendees. The committee organizing the seminars/panel discussions should use the titles given by the speakers.
Seminars were held twice in the past on these two topics in BMM conventions and also in VHPA (Vishwa Hindu Parishad of America) conferences and other places when the attendance and the response were always huge. That we missed and attendees also missed to take advantage during BMM 2017.

--16. During one singing program, the singer and the master of ceremony asked many, many times the audience to give hand (taalyaa). A presenter need not ask the audience to give hand; the audience should itself be enthused to do so due to the excellence of a performance.

--The purpose in sending this is to commend the good work and to highlight the issues helpful to the next convention organizers and not to criticize anyone. I do not know how to send to this to the new, 2019, committee.

...............................

**About 2017 Bruhan Maharashtra Mandal Convention in Grand Rapids, Michigan**

**By Ravi Ozarker, Houston Texas**

I had the privilege to attend the three day Bruhan Maharashtra Mandal (BMM) Convention in Grand Rapids, MI with my family from 6th – 9th July. The idea behind this convention is to bring people all across the U.S and Canada to celebrate Marathi Arts and Culture.

Bruhan Maharashtra Mandal of North America (BMM) is an umbrella organization of all Marathi organizations across North America. There are more than 52 Marathi Mandals in USA/Canada and BMM helps get Marathi Programs from USA and North America to local Mandals, helps with administration of Marathi Shala (Marathi School), participates in fundraising activities for people in need (e.g. raised funds for farmers in Maharashtra who were affected by the drought in 2016). BMM also organizes a BMM Convention bi-annually which is a huge undertaking by local Mandals. Local Mandals form a team and bid to host the BMM Convention in their cities. With rising costs and increasing number of attendees, hectic work schedules, hosting a BMM Convention these days is a huge undertaking for local Mandals and hence my sincere salute to all who make this happen.

There are other great initiatives and benefits behind this convention (e.g. Business Conferences, Exhibit and Vendor Booths, Matchmaking, Kids events and so much more). BMM administers Marathi Shala (Schools) in several states in USA and Canada. Shala volunteers and children were recognized and many prominent contributions by Marathi Entrepreneurs, social workers, artists, book publishers etc. are also recognized. It is also a great place to socialize and make new friends.

The 2017 BMM Convention was organized by the Maharashtra Mandal of Detroit. Volunteers had worked day and night for two years and following were the highlights from what I saw (really it is very hard to describe what I saw but I will definitely try my best.):

- Granth Dindi – Parade with about 1,000 participants from U.S.A, Canada, China, India, New Zealand, and Australia on the streets of Grand Rapids. Well-dressed men, women and children danced on the streets (Lezim) of Grand Rapids, MI on the beats of 100 + dhols (drums). Even local people from Grand Rapids, MI admired the enthusiasm. The day before the Dindi, As I was talking to a friend of mine in the hallway of a hotel at night, a local lady of Grand Rapids, MI approached us and started asking us about the Dindi/parade. She had more knowledge about where it was going to start etc. than me and the next day I saw her and her children taking photos of the Dindi. Another scene that I remember was a 2 yr old child dancing on the beats of the dhol. After the Dindi, Shri. Manohar Parikar's (Defense Minister of India) words of appreciation was a gift for all people in USA. He said, "After participating in this Dindi, I feel as if I was in India or I have come back to my days of IIT Campus. He said, I don't feel worried that our great Indian culture is retained in the new generation in USA/Canada but now I feel worried about the new generation in India. You all have setup a great example." Shri. Manohar Parikar graduated from India's prestigious Indian Institute of Technology (IIT) where only the cream of Indian students/brains are selected.

- Prominent Maharashtrian and Konkani leaders/celebrities (Shri Manohar Parikar, Defense Minister of India and CM of Goa, Nana Patekar (Famous Hindi and Marathi Movie Actor), Prashant Damle (Famous Marathi Movie Actor and Stage Actor), Rahul Deshpande, Mahesh Kale (Famous Marathi Classical Vocalists), Sonali Kulkarni, Sukanya Mone, Vijay Kenkre (Famous Marathi Movie and Natak Director), Aditya Oke, Swapnil Bandodkar, Bela Shende, Amar Oak, Satyajit Prabhu, Nilesh Parabh, Pushkar Shrotri, Nikhil Phatak, Ramdas Phutane, Ashok Naigaonkar, Rujuta Diwekar and many many more. Not only did these artists attend this event but also performed live in several programs. MuZeecians, Swapnil Bandodkar and Bela Shende Live Concert, Sangeet Sanshaykallol by Prashant Damle and Rahul Deshpande, Gappa with "Natasamrat", Haasyadhara by Ramdas Phutane and Ashok Naigaonkar just to name a few.

- Many programs presented by Marathi Artists in U.S.A including Moruchi Mavashi, AgniDivya, Sur Sargam, etc. My son now boasts that he has attended more events than me and my wife at this year's BMM Convention. That is true! While me and my wife were busy with other things, my son choose to attend Sukanya Mone's "Shaktiroopena" show. After attending the show, he told me that we had missed the best program of BMM Convention. He thoroughly enjoyed all the dances and took pictures. He also gave me some details of the program and I felt that I should have attended it too.

- Superb food services offered by Maharashtra Mandal of Detroit. Not only was this food tasty but the way they offered and organized food for 3,500+ attendees was simply amazing. The work of people who have managed the "Auto City of USA" was clearly visible to me.

Many volunteers worked on making the BMM 2017 Convention successful and I felt so good to see their team work. The Maharashtra Mandal of Detroit presented a flawless superhit opening ceremony which was based on the theme of colors. This ceremony not only included young dancers and musicians but kids and seniors too. The brains behind this convention was the BMM Convention Committee and BMM 2017 Convention Convener, Anjali Anturkar and Hema Rachmale, Co-Convener, BMM President Niteen Joshi. Having known Anjali personally and through very good friends, she has spent hours planning this convention along with her husband Nitin. I saw both of them running around and resolving issues during the convention also while we were enjoying this event for three days. Anjali's team was constantly cheering her whenever she came on stage.

I am so happy that the 2019 BMM Convention will be in Dallas, Texas. This way more of my friends from Houston and Austin will be able to attend. The Dallas Maharashtra Mandal also is very excited about winning this convention bid and have done a lot of ground work. The enthusiasm of the Dallas Mandal was visible in their amazing "Texas" themed video invitation and so many volunteers who came on the stage after Dallas Convener Dilip Rane took the convention flag from Detroit Mandal. After attending the Los Angeles, CA and Grand Rapids, MI Conventions, I feel that this convention is "our convention" "more" and definitely we will do our best in supporting the Dallas Maharashtra Mandal. After looking at the amount of dedication that the volunteers at Grand Rapids, MI Convention have shown, I feel like volunteering and supporting this great initiative as they mentioned that they will be looking at San-Antonio, Austin and Houston for support also.

The BMM Elections for BMM Committee takes place at the BMM Convention. Our dear friend, Avinash Padhye was elected the President of BMM. I am so happy to see this happen as Avinash was the Co- Convener of Rhode Island Convention which was a very successful convention that my wife had attended. The "best of the best" team who won the elections (i.e. 12 individuals from USA and Canada) will be running BMM operations for the next two years. I am also very proud of my wife Megha Ozarker from Houston has been elected as the BMM Treasurer for 2017 to 2019. Not because she is my wife, but I know she is a "super woman" who is always trying to serve our community as this is her passion. Megha was the President of the Houston Maharashtra Mandal in 2014 and 2016 and also was BMM Executive Member in 2015 – 2017. I wish her all the best in her new role as the BMM Treasurer!

A big thank you to all the organizers, volunteers, and sponsors that made this miracle happen on US soil!

…………………

**Anil W. Saraf (Triveni Mitra Mandal, Cincinnati).**

I will also compliment the food committee for doing an amazing job not only in menu-selection but also in the way it was served (with 3500+ people - absolutely no waiting in line, ample sitting room, quick clean-up, no food-shortage).
The dindi was well organized and brought a charm to the program owing to participation by all.
Some shortcomings:
The program agenda went online less than a week prior to the date - wish a general agenda was made available earlier with a "subject to change" disclaimer (so that people would know what they are paying for).
The DeVos theater could have had projection screens (similar to Van Andel) since you could barely see the faces on the stage from the back.
Assigned seats in Van Andel should have had a tiered approach using a combination of cost and time-of-ticketing, especially since it was marketed that way.
Nevertheless, the general organization and program line-up made up for the shortcomings and Dallas could use these tips to improve the user-experience further.
All in all, great job and well done, Detroit!
……………………………………………………………………………………

***